प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

एप्रिल 05, 2016

**ब्रम्हावर्त कमर्शियल सहकारी बँक लि. कानपुर, उत्तरप्रदेश ह्यांना दिलेल्या निदेशांना आरबीआयकडून जुलै 06, 2016 पर्यंत मुदतवाढ**

ब्रम्हावर्त कमर्शियल सहकारी बँक लि., कानपुर, उत्तर प्रदेश ह्यांना दिलेल्या निदेशांना भारतीय रिझर्व बँकेने, एप्रिल 07, 2016 पासून जुलै 06, 2016 पर्यंत अशी तीन महिन्यांची मुदतवाढ पुनरावलोकनाच्या अटींवर दिली आहे. बँकिंग विनियामक अधिनियम 1949 (एएसीएस) च्या कलम 35 अ खाली देण्यात आलेल्या निदेशांखाली वरील बँक जुलै 07, 2015 पासून ठेवण्यात आली होती. वरील निदेश सुधारित करण्यात आला व त्याची वैधता एप्रिल 06, 2016 पर्यंत वाढविण्यात आली. मार्च 28, 2016 च्या निदेशान्वये ह्या निदेशांची वैधता जुलै 6, 2016 पर्यंत वाढविण्यात आली. वरील निदेशांच्या इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मार्च 28, 2016 च्या ह्या निदेशाची एक प्रत जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

**अजित प्रसाद**

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/ 2345** सहाय्यक सल्लागार